# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 19 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- सी–व्हिजिल ॲपवर राज्यभरातून तक्रारींचा ओघ–निवडणूक आयोगाकडून ९८ टक्क्यांहून अधिक तक्रारी निकाली
- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग
- भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती
- ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक अनुराधा औरंगाबादकर यांचं निधन–पुण्यात अंत्यसंस्कार

आणि

- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पीक वाणांचा राष्ट्रीय राजपत्रात समावेश

****

विधानसभा निवडणुकीसाठीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १५ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण ४२० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी ४१४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या, यामध्ये ठाणे जिल्ह्यातल्या सर्वात जास्त तक्रारींचं निवारण करण्यात आलं आहे. याकाळात राज्य शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आणि मौल्यवान धातू आदी बाबतीत एकूण कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीमध्ये विधानसभेच्या एकूण २८८ जागांपैकी भाजपाला दीडशे, शिवसेना ८७ ते ९० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागांवर लढण्यासाठी इच्छुक आहे. दरम्यान, इच्छुक उमेदवारांची संख्या जास्त असल्याने अनेक ठिकाणी बंडखोरीची शक्यता आहे. त्या अनुषंगानेही महायुतीची चर्चा होत असल्याचं वृत्त आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई इथं काँग्रेसच्या वरिष्ठ निरिक्षकांची बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गहेलोत, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजित सिंग चन्नी, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण तसंच इतर राज्यातील नेते उपस्थित होते

दरम्यान, चेन्निथला यांनी, आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मातोश्री या त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. उद्धव ठाकरे यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी आपण त्यांच्या निवासस्थानी आलो होतो, महाविकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत, असं चेन्नीथला यांनी यावेळी सांगितलं.

****

समाजवादी पार्टीचे अध्यक्ष खासदार अखिलेश यादव यांनी आज धुळे इथं माध्यमांशी संवाद साधला. धुळे आणि मालेगावची जागा समाजवादी पार्टी लढवेल हे नक्की असून, या दोन जागांसह एकूण १२ जागांची मागणी समाजवादी पार्टीने महाविकास आघाडीकडे केली असल्याचं, यादव यांनी सांगितलं. महाविकास आघाडीत जागा वाटपाची चर्चा यशस्वी होईल असा विश्वास अखिलेश यादव यांनी व्यक्त केला.

****

विधानसभा निवडणूक आचारसंहिता पार्श्वभूमीवर आज पहाटे सिंधुदुर्ग राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकानं मुंबई गोवा महार्गावर केलेल्या कारवाईत १८ लाख रुपयांचं गोवा बनावटीचं मद्य आणि ८ लाख रुपयांचा टेम्पो असा २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी टेम्पो चालकाला ताब्यात घेण्यात आलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हे पद भूषवणाऱ्या त्या पहिल्याच मराठी महिला ठरल्या आहेत. या पदाला केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. २००७ ते २०१० या कालावधीत छत्रपती संभाजीनगरच्या महापौर असलेल्या रहाटकर यांनी, महाराष्ट्र भाजप युवा मोर्चाच्या उपाध्यक्ष, भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, भाजपच्या राष्ट्रीय सचिव अशी विविध पदं भुषवली आहेत. रहाटकर यांची अनेक पुस्तकं प्रकाशित असून त्यामध्ये `विधिलिखित` या महिलांच्या कायदेविषयक पुस्तक मालिकेचं संपादन, `अग्निशिखा धडाडू द्या`, `औरंगाबाद : लीडिंग टू वाईड रोड्स`, `मॅजिक ऑफ ब्लू फ्लेम` यांचा समावेश आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्तीबद्दल केंद्र सरकारचे आभार मानतांना, या पदाची जबाबदारी समर्पण भावनेनं पार पाडणार असल्याची भावना त्यांनी आकाशवाणीशी बोलतांना व्यक्त केली.

> ***अनेक क्षेत्रांमध्ये जसं की शिक्षण आहे, आरोग्य आहे, महिलांचे सामाजिक स्थान आहे. यासारख्या वेगवेगळ्या मुद्यांच्या आधारे महिलांच्या क्षमता आणि संधींना अधिकाधिक गती पण त्यांचा सुध्दा प्रयत्न नक्कीच करायला हवा. महिलांच्या नेतृत्वाखाली विकास यात्रेला चालना आपण दिली पाहिजे याकरीता मी प्रयत्न केले पाहिजे असंही मला वाटतं. या पदाचं निर्वाहन जे आहे ते मी खूप जबाबदारीने करेन आणि समर्पण भावनेने करेल.***

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज 'राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं' नवी दिल्ली इथं उद्घाटन झालं. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिकण्याचा कार्यक्रम पूर्ण करेल. राष्ट्रीय

शिक्षण सप्ताहात वैयक्तिक नागरिक, विविध मंत्रालयातल्या विभागातले कर्मचारी आणि इतर संघटनांमध्ये काम करणारे कर्मचारी सहभागी होतील. डिजिटल परिसंस्थेच्या मदतीनं नागरिकांच्या हितासाठी प्रशासकीय यंत्रणा तयार व्हावी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावं, या उद्देशानं सप्टेंबर २०२० मध्ये कर्मयोगी अभियान सुरू करण्यात आलं. नागरी सेवा देणाऱ्यांसाठी क्षमता निर्मिती आणि मानव संसाधन व्यवस्थापनासाठी विकास साधण्याचा हा कार्यक्रम आहे.

****

महाराष्ट्रासह ओडिशात नक्षल चळवळीत काम करणाऱ्या एका जोडप्याने आज गडचिरोली पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. असिन राजाराम कुमार ऊर्फ अनिल ऊर्फ गगनदीप ऊर्फ निशांत ऊर्फ सुशांत आणि अंजू सुळ्या जाळे उर्फ सोनिया उर्फ जनिता असं या जोडप्याचं नाव आहे. त्यांच्यावर आठ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

****

ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक अनुराधा औरंगाबादकर यांचं काल पुण्यात दीर्घ आजारानं निधन झालं, त्या ८६ वर्षांच्या होत्या. १९७० च्या दशकात देशदूत वृत्तपत्रापासून पत्रकारितेला प्रारंभ केलेल्या अनुराधा औरंगाबादकर यांनी १९९८ पर्यंत साप्ताहिक गावकरीमध्ये कार्यरत राहून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांची विविध विषयांवरची ९० पुस्तकं प्रकाशित आहेत. त्यांच्या पार्थिव देहावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश राष्ट्रीय राजपत्रात करण्यात आला आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने याबाबतची अधिसूचना प्रसिध्द केली असून या पाच वाणात विद्यापीठ विकसित हरभऱ्याचा परभणी चना-१६, सोयाबीनचा एम ए यू एस-७३१, देशी कपाशीचा पी ए ८३३, अमेरिकन कपाशीचा एन एच ६७७ आणि तीळाचा टी एल टी -१० या वाणांचा समावेश आहे. देशाच्या राजपत्रात समावेश झाल्यामुळे या वाणांचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्यास मदत होवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नत्ती साधता येईल असा विश्वास विद्यापीठाचे कुलगुरू मा डॉ. इन्द्र मणि यांनी व्यक्त केला आहे. हे वाण विकसित करण्यास योगदान देणारे मुख्य शास्त्रज्ञ डॉ खिजर बेग, डॉ. व्ही. एन. चिंचाने, डॉ डि. के. पाटील, डॉ एस. पी. मेहत्रे, डॉ. व्ही. के.

गीते, आणि डॉ.मोहन धुप्पे यांच्यासह सर्व संबंधित शास्त्रज्ञांचं कुलगुरू इंद्र मणी यांनी अभिनंदन केलं आहे.

****

बंगळुरू इथं भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरु असलेली पहिली कसोटी जिंकण्यासाठी न्यूझीलंडला १०७ धावांची आवश्यकता आहे. आज चौथ्या दिवशी भारताचा दुसरा डाव सर्वबाद ४६२ धावांवर आटोपला. दुसऱ्या डावात सर्फराज खान १५०, ऋषभ पंत ९९, विराट कोहली ७० तर कर्णधार रोहित शर्माने ५२ धावा केल्या आहेत. न्यूझीलंडची दुसऱ्या डावात फलंदाजी सुरू झाली, मात्र चार चेंडूत एकही धाव काढलेली नसतांनाच पाऊस तसंच अपुऱ्या प्रकाशानं, आजचा खेळ थांबवण्यात आला.

****

नांदेड जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यावर प्रशासकिय यंत्रणांनी भर द्यावा, असे निर्देश नांदेडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत. ते आज यासंदर्भातल्या बैठकीत बोलत होते. जिल्ह्यात विधानसभा आणि लोकसभा पोटनिवडणूक एकत्र होत आहे. त्यामुळं आचारसंहितेच्या या काळात संभाव्य गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

अहिल्यानगर जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीनं आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगानं तयार करण्यात आलेल्या निवडणूक पूर्वपीठिकेचं प्रकाशन आज राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते शिर्डी इथं करण्यात आलं. या पुस्तिकेत निवडणूक आचारसंहितेबाबत तरतुदी, निवडणूक वार्तांकनासाठी प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्त्वे, आदींबाबत सविस्तर माहिती या पुस्तिकेत दिली आहे.

****